# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७२ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ०१/०९/२०१८

## " पोटच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या बापास आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे अडयाळ अंतर्गत मौजा कोसरा येथिल राहणारा ईसम इब्राहीम करीम शेख याने स्वतःचे मुलीवर बलात्कार केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक १.०९.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन भंसाली सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व २५००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, तक्रारदार हया दिनांक १०.१०.२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास ग्राम पंचायत, कोसरा येथे मिटींग करीता गेल्या तसेच पती इब्राहीम शेख हा शेतावर औषधी फवारणी करीता निघुन गेले व मुलगी, वय १८ वर्ष हि एकटीच घरी हजर होती. दुपारी १.३० वा. सुमारास इब्राहिम शेख हा शेतावरून फवारणी करुन घरी आला व घरी हजर असलेल्या मुलीस जेवण देण्यास सांगीतल्याने मुलगी हिने वडील इब्राहीम शेख यास जेवन देवुन घराचे मधले खोलीत झोपली असता वडील इब्राहीम शेख याने मुलगी हिचे जबरीने तोंड ताबुन विवस्त्र करून बलात्कार केला व याबाबत कोणालाही काही सांगीतल्यास ठार मारण्याची धमकी दिली असे पिडित मुलीने आपले आईस दिनांक १२.१०.२०१८ रोजी घटणेबाबत सर्व हकीकत सांगीतल्याने पिडित मुलीची आई हिने पोलीस ठाणे अडयाळ येथे येवुन पोटच्या मुलीवर कुकर्म करणारा पती इब्राहीम करीम शेख याचे वर कार्यवाही करण्याकरीता तक्रार दिलेवरून आरोपी विरूध्द अपराध क्रमांक ५७/१६ कलम ३७६(१)(२)(फ), ५०६ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक गफार खलील शेख यांनी सुरु करुन गुन्हयातील आरोपी इब्राहीम करीम शेख, वय ४० वर्ष रा. कोसरा ता. पवनी जिल्हा भंडारा यास तात्काळ कायदेशिर अटक करून पिडित मुलीची व आरोपीची वैद्यकीय तपासणी करून गुन्हयात साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपपत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५७/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. प्रमोद भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय भंडारा** यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १.०९.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी इब्राहीम करीम शेख, वय ४० वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३७६(१)(२)(फ) भादवि मध्ये आजन्म सश्रम कारावास व पिडितेस २५०००/-रुपये नुकसाण भरपाई देण्याचे आदेशीत केले तसेच कलम ५०६ भादवि मध्ये ६ महिणे कारावास व १००० रूपये दंडाची**

**शिक्षा ठोठावण्या आली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, सुरेश ढोबळे, ठाणेदार पोलीस ठाणे अडयाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार साठवणे यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.